उत्सव विकासाचा
Celebration of Development
एम एम आर डी ए
MMRDA

एम एम आर डी ए
MMRDA

क्रमांक : प्र/आस्था-२/शार्प ६०२०NV/२०२६/४९६ दिनांक : ११ मार्च, २०२६

**विषय :शार्प कंपनीच्या AR-६०२०NV, ए-३ आकाराच्या ५ टेबल प्रिंटरचा वार्षिक देखभाल करार करणेबाबत.**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या परिवहन व दळणवळण विभाग/उद्यान कक्ष, विधि शाखा, अभियांत्रिकी शाखा, प्राधिकरणाचे ठाणे येथील उप प्रादेशिक कार्यालय आणि महाराष्ट्र निसर्ग उद्यान येथे शार्प कंपीनीच्या AR-६०२०NV मॉडेलची ए-३ आकाराची ५ टेबल प्रिंटर कार्यरत आहेत. सदर टेबल प्रिंटर सन २०२२ रोजी खरेदी करण्यात आली.

२. उपरोक्त नमूद विभागात कार्यरत ह्यांचा यंत्रांचा वार्षिक देखभाल करार दोन वर्षे कालावधीकरीता व सदर कालावधीत आवश्यकतेनुसार कन्झ्युमेबल्सची खरेदी करण्याकरीता प्राधिकृत सेवापुरवठादारांकडून दरपत्रक मागवित आहे. इच्छुक स्थानिक प्राधिकृत सेवापुरवठादाराने त्यांची दरपत्रके दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सचिव, कार्यकारी समिती, प्रशासन विभाग येथे सादर करावीत. सदर मुदतीनंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

३. प्राधिकृत सेवापुरवठादाराने दरपत्रक कंपनीच्या लेटर हेडवर तसेच दरपत्रकासोबत मालकाचे नाव व कंपनीचे पॅनकार्ड, जीएसटी प्रमाणपत्र व अधिकृत सेवापुरवठादार प्रमाणपत्र सादर करावेत.

**दरपत्रकाचा नमुना**

| अ. क्र. | मॉडेल क्र. | यंत्र क्रमांक | युनिट प्रती दर रू. | नग | रक्कम रू. GST वगळून | वस्तु व सेवा कर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शार्प ६०२०NV | 1300051X | | ५ | | |
| | | 1300045X | | | | |
| | | 13001699 | | | | |
| | | 130015X | | | | |
| | | 1300035X | | | | |
| २ | कन्झ्युमेबल्स | टोनर | | आवश्यकतेनुसार | | |
| | | ड्रम | | आवश्यकतेनुसार | | |
| | | डेव्हलपर | | आवश्यकतेनुसार | | |
| | | क्लिनिंग ब्लेड | | आवश्यकतेनुसार | | |

..२/-

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
ईपीएबीएक्स : +९१ २२ ६५९६ ०००१ / ४०००
https://mmrda.maharashtra.gov.in

४. उपरोक्त विषयासंबंधीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

प्राधिकृत सेवापुरवठादारास यापूर्वी शासकीय / निमशासकीय कार्यालयास शार्प झेरॉक्स टेबल प्रिंटर यंत्रांचा वार्षिक देखभाल सेवा पुरविण्याचा ५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२) प्राधिकृत सेवापुरवठादाराने पुढील दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे –

१) PAN Card
२) Aadhar Card
३) GST Certificate
४) MSME Udyam Adhar Certificate
५) Last ३ years IT return certificate
६) Authorized Certificate of Service Provider by Sharp

३) यंत्रांच्या देखभालीकरीता येणाऱ्या सेवापुरवठादाराच्या अभियंत्यास कोणत्याही प्रकारचे Mechanic Wages, installation charges, parts, spare parts, labour, tool इ. करीता कोणताही खर्च प्राधिकरणाद्वारे दिला जाणार नाही.

४) शार्पच्या प्राधिकृत सेवापुरवठादाराचा मागील तीन आर्थिक वर्षातील प्रती वार्षिक आर्थिक उलाढाल रू.२/- कोटी असणे आवश्यक आहे.

५) वार्षिक देखभाल करारांतर्गत देखभाल, आवश्यकतेनुसार टोनर्स पुरविणे, त्रैमासिक देखभाल व दुरूस्ती (आवश्यकतेनुसार), यंत्राच्या पार्टसमध्ये बिघाड झाल्यास तो बदलून त्याच कंपनीचा पार्टस / स्पेअर पार्टस बसवून देऊन सदर यंत्र पूर्ववत कार्यरत करणे इ. समावेश आहे.

६) बिघाड झालेल्या यंत्रातील दोष शोधून त्याचे ४८ तासांत निवारण करणे आवश्यक आहे. सदर यंत्राची दुरूस्ती संबंधित विभागामध्ये करणे आवश्यक आहे. अपरिहार्य परिस्थितीमध्ये सदर यंत्र त्यांच्या वर्कशॉपमध्ये दुरूस्तीकरीता नेल्यास त्याजागी तातडीने दुसरे स्टॅण्डबाय झेरॉक्स यंत्र सेवापुरवठादाराने पुरविणे आवश्यक आहे.

७) शार्पच्या प्राधिकृत सेवापुरवठादार हा स्थानिक असावा तसेच त्याचे कार्यालय मुंबई परिसरात असावे.

८) निविदा क्रमांक OEM Manufacturers Authorization from (MAF) Certificate असणे आवश्यक आहे.

९) प्राधिकृत सेवा पुरवठादाराचा समावेश शासनाच्या काळ्या यादीत नसावा. तसे आढळल्यास त्याची निविदा ग्राह्य न धरता ती रद्द करण्यात येईल.

१०) वार्षिक देखभाल कराराच्या कालावधीमध्ये दरामध्ये प्राधिकृत सेवापुरवठादाराने नमूद केलेले दरच कायम राहतील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दर वाढ/बदल केला जाणार नाही.

११) प्राधिकृत सेवापुरवठादाराकडून पुरविण्यात येणारी सेवा समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सदर करार मुदतीच्या आधी त्याबाबतची सूचना देऊन अथवा न देता रद्द करण्याचा अधिकार आहे.

१२) देयक सादर केल्याच्या दिनांकापासून देयकाची रक्कम सुमारे ४५ दिवसांत ई-पेमेंटद्वारे अदा करण्यात येईल.

१३) आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे कार्यादेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन दिवसांच्या आत उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्राधिकरणास लेखी पत्र सादर करावे.

१४) हे प्राधिकरण कोणत्याही कारणाशिवाय कोणतीही निविदा / दरपत्रक फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहे.

१९/३/२०२६

**सचिव,**
**कार्यकारी समिती (अ.का.)**